# राज्यव्यवस्था

# Workbook

## घटकनिहाय सराव प्रश्नसंच

PRITHVI®
Publication

**राज्यव्यवस्था : Workbook**
**घटकनिहाय सराव प्रश्नसंच**

**© पृथ्वी पब्लिकेशन**

**प्रकाशक**
'पृथ्वी पब्लिकेशन', 1536,
सदाशिव पेठ, पुणे. 411030
**: 8390554161**

**मुखपृष्ठ मांडणी**
**रसिका सागवेकर**

**मांडणी**
**अपूर्वा शिंदे**

**मुद्रितशोधन**
**प्रज्ञा भोसले**

**वितरण व्यवस्था**
**: 8390554161**

**अभिप्राय, सूचना व मागणीसाठी संपर्क**
**: 8390554161**
: admin@prithvi.net.in

**मूल्य**
₹ २१०/-

PRITHVI®
Publication

या पुस्तकातील मजकुराचे कायदेशीर हक्क कॉपीराईट कायद्यानुसार प्रकाशकाकडे आहेत. या मजकुराचे कोणत्याही स्वरूपात पुनर्मुद्रण करण्यासाठी प्रकाशकाची परवानगी आवश्यक आहे. सदर बाबीचे उल्लंघन झाल्यास कॉपीराईट कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

या पुस्तकातील मजकूर व माहिती विविध स्त्रोतांमधून घेण्यात आली आहे. हा मजकूर व माहिती जास्तीत जास्त अचूक ठेवण्याचा प्रयत्न प्रकाशकाने केला आहे. तरीदेखील त्यामध्ये कालसापेक्ष व स्थलसापेक्ष बदल होऊ शकतात. या पुस्तकातील मजकूर व माहिती यामुळे होणाऱ्या नुकसानीस प्रकाशक जबाबदार राहणार नाहीत.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1. | घटना निर्मिती आणि राज्यांची निर्मिती | 6 |
| | उत्तरे | 23 |
| 2. | मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत कर्तव्य | 24 |
| | उत्तरे | 42 |
| 3. | घटनात्मक खटले, आयोग | 43 |
| | उत्तरे | 58 |
| 4. | केंद्रीय कार्यमंडळ | 59 |
| | उत्तरे | 67 |
| 5. | संसद | 68 |
| | उत्तरे | 107 |
| 6. | राज्य कार्यकारी मंडळ, राज्य विधीमंडळ | 108 |
| | उत्तरे | 116 |
| 7. | न्यायव्यवस्था | 117 |
| | उत्तरे | 127 |
| 8. | राज्य सरकार व प्रशासन (महाराष्ट्राचा विशेष संदर्भासह) | 128 |
| | जिल्हा प्रशासन, ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन | |
| | उत्तरे | 151 |
| 9. | शिक्षण पद्धती, पक्ष आणि दबाव गट, प्रसारमाध्यमे | 152 |
| | उत्तरे | 175 |
| 10. | निवडणूक प्रक्रिया | 176 |
| | उत्तरे | 193 |
| 11. | प्रशासनिक कायदा, केंद्र सरकारचे व राज्य शासनाचे विशेषाधिकार | 194 |
| | उत्तरे | 201 |
| 12. | कायदे | 202 |
| | उत्तरे | 234 |
| 13. | सार्वजनिक सेवा, सरकारी खर्चावर नियंत्रण | 235 |
| | उत्तरे | 250 |

# 4. केंद्रीय कार्यकारी मंडळ

**प्र.1. खालील विधाने विचारात घ्या.**

**अ) भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 262 अन्वये संसदेला कायद्याद्वारे आंतरराज्यीय नद्यांच्या किंवा नदी खोऱ्यांतील पाण्यासंबंधीच्या तंट्यांच्या अभिनिर्णयाकरिता तरतूद करता येते.**

**ब) अनुच्छेद 262 अन्वये केंद्र शासनाला आंतरराज्यीय नदी जलवाटप लवाद स्थापन करण्याचा अधिकार आहे.**

**वरीलपैकी बरोबर नसलेले/ली विधान/ने निवडा.**

1) अ आणि ब दोन्ही    2) अ आणि ब दोन्ही नाही

3) फक्त अ    4) फक्त ब

**प्र.2. .........द्वारे कृषी उत्पन्न कर (Agricultural Income Tax) जमा करण्याचा अधिकार राज्यांना दिला गेला आहे.**

1) वित्त आयोगाद्वारे    2) राष्ट्रीय विकास परिषदेद्वारे (By NDC)

3) आंतरराज्यीय परिषदेद्वारे    4) भारतीय संविधानाद्वारे

**प्र.3. आंतरराज्यीय परिषदेमध्ये (Inter-State Council) खालीलपैकी कोणाचा समावेश होतो?**

**अ) प्रधानमंत्री**

**ब) सर्व राज्यांचे मुख्यमंत्री**

**क) विधानसभा असलेल्या केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री**

**ड) 9 केंद्रीय कॅबिनेट मंत्री**

**इ) विधानसभा असलेल्या केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासक**

1) अ, ब, क    2) अ, ब, क, ड    3) अ, ब, क, इ    4) अ, ब, क, ड, इ

**प्र.4. खालीलपैकी कोण केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणाच्या अधिकारक्षेत्रात (jurisdiction) येत नाही?**

**अ) लष्करी सेवांचे कर्मचारी**    **ब) सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारी व कर्मचारी**

**क) संसदेच्या सचिवालयाचे कर्मचारी**    **ड) अखिल भारतीय सेवांमधील अधिकारी**

1) अ आणि ब फक्त    2) अ, ब, क

3) अ, क, ड    4) अ, ब, क, ड

**प्र.5. खालीलपैकी कोणत्या अनुच्छेदान्वये राज्यांना व्यवसाय कर (Professional Tax) वसूल करण्याचा अधिकार मिळाला आहे?**

1) 275    2) 276    3) 277    4) 279A

**प्र.6. खालीलपैकी कोण भारताच्या कार्यकारी मंडळाचा (Executive) भाग असत नाही?**

**अ) मंत्रीमंडळ** **ब) पंतप्रधान**

**क) भारताचे महान्यायवादी (Attorney General)** **ड) उपराष्ट्रपती**

1) फक्त अ 2) फक्त क 3) फक्त ड 4) यापैकी नाही.

**प्र.7. बरोबर विधाने ओळखा :**

**अ) आंतरराज्य परिषदे (Inter State Council) चे सचिवालय हे 1991 मध्ये स्थापन झाले.**

**ब) स्थापनेपासूनच हे सचिवालय विभागीय परिषदांचे (Zonal Councils) सचिवालय म्हणूनही काम पहाते.**

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही 4) एकही नाही.

**प्र.8. खालीलपैकी कोणते पद हे दिलेल्या पदांमध्ये प्राधान्यक्रम सूची (Tale of Precedence) नुसार सर्वोच्च पद आहे ?**

1) भारताचे महान्यायवादी (Attorney General of India)

2) केंद्रीय स्तरावरील कॅबिनेट मंत्री

3) केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष (Chairman of UPSC)

4) माजी राष्ट्रपती (Former Presidents)

**प्र.9. योग्य पर्याय ओळखा.**

**अ) राजीव मेहरिषी हे भारताचे 12 वे महालेखापाल (CAG) आहेत.**

**ब) 2008 ते 2013 या कालावधीत 'विनोद राय' हे भारताचे 'कॅग' होते.**

**क) विनोद राय हे सध्या अल्पसंख्यांक आयोगाचे उपाध्यक्ष आहेत.**

1) अ, क योग्य 2) फक्त ब योग्य

3) अ, ब योग्य 4) अ, ब, क योग्य

**प्र.10. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (CAG) यांना ............चा मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक म्हटले जाते.**

1)भारताचे नागरिक (citizens of India)

2) लोकलेखा समिती (Public Account Comittee)

3)भारताचे राष्ट्रपती (President of India)

4) भारतीय संसद (Parliament of India)

**प्र.11. कायदे करणे हे संसदेचे महत्त्वाचे कार्य आहे. कायदे करण्याव्यतिरिक्त संसदेकडून खालीलपैकी कोणती कार्ये पार पाडली जातात ?**

**अ) प्रतिनिधित्व करणे.**

**ब) कार्यकारी मंडळावर अंकुश ठेवणे.**

**क) सरकारला वैधता (Legitimacy) प्रदान करणे.**

1) अ आणि ब फक्त 2) अ आणि क फक्त

3) ब आणि क फक्त 4) अ, ब, क

# संसद - 4

**प्र.1. जर एखाद्या व्यक्तिची राष्ट्रपती म्हणून झालेली निवडणूक सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल केली तर त्या व्यक्तिने तत्पूर्वी केलेले आदेश, हे.....**

1) विधिअग्राह्य ठरतात. (Invalid) 2) विधिग्राह्य ठरतात. (Valid)

3) विधिग्राह्य अथवा अग्राह्य सर्वोच्च न्यायालय ठरवते. 4) प्रकरणपरत्वे ठरविले जाते.

**प्र.2. खालील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.**

**अ) जरी लोकप्रतिनिधित्व अधिनियम, 1951 अन्वये गुन्हेगार असलेल्या उमेदवारांना किंवा लोकप्रतिनिधींना अपात्र ठरविता येत असेल तरी त्या व्यक्तिंच्या पक्षातील उच्च पदांवरील नियुक्तीला कोणतीही आडकाठी नाही.**

**ब) एखाद्या लोकप्रतिनिधीला अपात्र घोषित केले जाऊ शकते, परंतु पक्षाच्या उच्च पदांवर तो कायम राहू शकतो, याचा अर्थ तो एक महत्त्वपूर्ण सार्वजनिक भूमिका बजावत असतो.**

1) अ बरोबर, ब चूक 2) अ चूक, ब बरोबर

3) दोन्ही विधाने बरोबर 4) दोन्ही विधाने चूक

**प्र.3. संविधानाच्या अनुच्छेद 102 अन्वये एखादी व्यक्ती, संसदेच्या दोहोंपैकी कोणत्याही सभागृहाचा सदस्य म्हणून निवडली जाण्यास आणि तसा सदस्य म्हणून राहण्यास पुढील कारणास्तव अपात्र होईल.**

**अ) जे लाभपद त्याच्या धारकास अपात्र करणारे नसल्याचे संसदेने कायद्याद्वारे घोषित केले आहे त्याहून अन्य असे, भारत सरकारच्या किंवा कोणत्याही राज्याच्या शासनाच्या नियंत्रणाखालील कोणतेही लाभपद तिने धारण केले असेल तर**

**ब) ती मनोविकल असेल व सक्षम न्यायालयाकडून तशी घोषित झाली असेल तर**

**क) ती अविमुक्त नादार असेल तर**

**ड) ती भारताचा नागरिक नसेल अथवा तिने स्वच्छेने परकीय देशाचे नागरिकत्व संपादिले असेल अथवा ती परकीय देशाला निष्ठा किंवा इमान देण्यास कोणत्याही कबुलीने बद्ध असेल तर**

**इ) ती संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा अन्वये अशा सदस्यत्वासाठी अपात्र झाली असेल तर.**

1) अ, ब, क, ड, इ 2) ब, क, ड, इ 3) अ, क, ड, इ 4) ब, क, इ

**प्र.4.खालीलपैकी चुकीचे विधान निवडा.**

1) भारताची किंवा त्याच्या राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागाची सुरक्षितता धोक्यात आली आहे अशी राष्ट्रपतीची खात्री झाली तर त्याला आणीबाणीची उद्घोषणा (Proclamation of Emergency) करता येते.

2) 'युद्ध' किंवा 'परचक्र' (war or external aggression) यांचा निकटवर्ती धोका असल्याबद्दल राष्ट्रपतीची खात्री झाली तर असे युद्ध किंवा परचक्र प्रत्यक्षात घडण्यापूर्वी राष्ट्रपतीला आणीबाणीची उद्घोषणा करता येते, मात्र 'सशस्त्र बंडा'च्या कारणास्तव जारी करण्यात येणारी उद्घोषणा असे बंड प्रत्यक्षात घडण्यापूर्वी करता येत नाही.

3) आणीबाणीची उद्‌घोषणा जारी करण्यात यावी असा केंद्रीय कॅबिनेट (Union Cabinet) चा निर्णय लेखी कळविण्यात आल्याखेरीज, राष्ट्रपती अशी आणीबाणीची उद्‌घोषणा जारी करू शकत नाही.

4) अनुच्छेद 352 अन्वये जारी केलेली आणीबाणीची उद्‌घोषणा नंतरच्या उद्‌घोषणेद्वारे रद्द करता येते किंवा बदलताही येते.

**प्र.5. के. के. वेणुगोपाल यांच्याविषयी पुढील विधाने वाचा.**

**अ) ते भारताचे महान्यायवादी (Attorney General of India) आहेत.**

**ब) भारताच्या उपराष्ट्रपतींकडून 2017 साली त्यांची या पदावर नियुक्ती केली गेली.**

**क) त्यांना भारत सरकारने यापूर्वीच पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित केले गेले आहे.**

**वरीलपैकी सत्य विधान/ने कोणते/ती आहे/त ?**

1) फक्त अ 2) अ, ब 3) अ, क 4) अ, ब, क

**प्र.6. राज्यसभेमधील केंद्रशासित प्रदेशाचे प्रतिनिधी हे ............. पद्धतीने निवडले जातात. रिकाम्या जागी बसणारा योग्य पर्याय निवडा.**

1) त्या-त्या केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभेच्या सदस्यांकडून अप्रत्यक्ष निवडणुकीच्या

2) लेफ्टनंट गव्हर्नर/प्रशासक यांच्याकडून नामनिर्देशना (nomination) च्या

3) राष्ट्रपतींकडून नामनिर्देशनाच्या

4) यापैकी नाही.

**प्र.7. सार्वजनिक निधी योग्यरीत्या व प्रभावीपणे वापरले जावेत यासाठी भारतात महालेखापाल (GAG - Comproller and Auditor General) यांच्या परीक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. खालील बाबींमध्ये महालेखापालांचे महत्त्व कायम आहे.**

**अ) राष्ट्रपतींनी राष्ट्रीय किंवा आर्थिक आणीबाणी जाहीर केल्यास संसदेच्यावतीने राजकोषाची जबाबदारी महालेखापाल सांभाळतात.**

**ब) विविध मंत्रालयांच्या कार्यक्रम आणि योजनांवरील महालेखापालांच्या अहवालाची सार्वजनिक लेखे समिती (Public account committee) द्वारे चर्चा केली जाते.**

**क) महालेखापालांच्या अहवालातील माहितीचा वापर तपास यंत्रणांना सार्वजनिक निधी वापरात गुन्हा करणाऱ्यांवर खटले दाखल करण्यासाठी करता येतो.**

**ड) सरकारी कंपन्यांच्या लेखे व लेखापरीक्षण करताना नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचा न्यायालयीन अधिकार महालेखापालांना आहे.**

**वरीलपैकी कोणती विधाने खरी आहेत ?**

1) अ, ब आणि ड 2) ब फक्त

3) ब आणि क 4) वरील सर्व

**प्र.8. राष्ट्रपतीच्या निवडणुकीत खालीलपैकी कोण कोण सहभाग घेत नाही ?**

1) लोकसभेचे निर्वाचित (elected) सदस्य 2) राज्यसभेचे नामनिर्देशित सदस्य

3) विधानसभेचे निर्वाचित सदस्य 4) राज्यसभेचे निर्वाचित सदस्य

# 9. शिक्षण पद्धती, पक्ष आणि दबाव गट, प्रसारमाध्यमे – 1

**प्र.1. 'विद्यालक्ष्मी' योजनेसंदर्भात सत्य विधाने ओळखा.**

**अ) शैक्षणिक कर्जासाठी एकात्मिक वेब पोर्टल सुविधा पुरविते.**

**ब) याअंतर्गत विद्यार्थी जास्तीत जास्त 3 बँकांना कर्जासाठी अर्ज करू शकतात.**

**क) याअंतर्गत विद्यार्थी कोणत्याही/सर्व बँकांना अर्ज करू शकतात.**

1) अ, क　2) ब, क　3) अ, ब, क　4) अ, ब

**प्र.2. ॲबोट वुड समितीच्या शिफारशीबद्दल योग्य पर्याय निवडा.**

**अ) सामान्य शिक्षण पद्धतीप्रमाणेच समांतर तांत्रिक/व्यावसायिक शिक्षण व्यवस्था उभारली जावी.**

**ब) या शिफारशींच्या आधारे भारतात पॉलिटेक्निक्स, टेक्निकल आणि कृषी विद्यालये उभारली गेली.**

1) फक्त अ　2) फक्त ब　3) दोन्ही　4) एकही नाही.

**प्र.3. पुढील शिक्षणविषयक समित्या त्यांच्या स्थापनेच्या कालानुक्रमे चढत्या क्रमाने लावा.**

**अ) ॲबोट–वुड समिती**　**ब) सप्रू समिती**

**क) वर्धा शिक्षण योजना**　**ड) हार्टोग आयोग**

1) ड–अ–ब–क　2) ड–ब–अ–क　3) ड–ब–क–अ　4) ड–अ–क–ब

**प्र.4. शिक्षण हक्क कायद्यानुसार सत्य विधाने कोणती ?**

**अ) हा कायदा संपूर्ण भारतभर लागू आहे.**

**ब) याअंतर्गत शिक्षकांनी आपली अर्हता 2019 पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.**

**क) 30 सप्टेंबर 2010 पूर्वी शाळा व्यवस्थापन समिती (SMC) स्थापन करणे अनिवार्य आहे.**

1) अ, क　2) ब, क　3) फक्त क　4) सर्व

**प्र.5. 'शाळा सिद्धी' (Shaala Siddhi) संदर्भात सत्य विधाने ओळखा.**

**अ) हे शाळा मूल्यमापनासाठीचे वेबपोर्टल आहे.**

**ब) हे NUEPA ने तयार केले आहे.**

**क) हे SSA अंतर्गत येते.**

1) अ, ब, क　2) अ, क　3) ब, क　4) अ, ब

**प्र.6. "RISE" योजनेसंदर्भात विधाने ओळखा.**

**अ) शिक्षणक्षेत्राच्या संशोधन व पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी ही योजना आखली आहे.**

**ब) या अंतर्गत सन 2022 पर्यंत त्यासाठी 10,000 रु. कोटींची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे.**

1) अ बरोबर　2) ब बरोबर　3) दोन्ही बरोबर　4) कोणतेही नाही.

**प्र.7. माध्यम क्षेत्रामध्ये लोकप्रिय असलेले रामनाथ गोएंका पुरस्कार हे .......... सालापासून दरवर्षी दिले जातात.**

1) 1984　3) 1992　2) 1999　4) 2006

**प्र.8. शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता निर्देशांकाबद्दल (School Education Quality Index) खालील विधाने लक्षात घ्या.**

**अ) हा नीती आयोग आणि मानव संसाधन विकास मंत्रालयाने तयार केला आहे.**

**ब) या अंतर्गत लर्निंग आऊटकम्सवर (Learning Outcomes) भर असतो.**

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही 4) दोन्ही नाही.

**प्र.9. संयुक्त राष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय बालशिक्षण निधीची खालीलपैकी कोणती उद्दिष्टे आहेत?**

**अ) बालकांची सर्वांगीण उन्नती होण्यासाठी प्रयत्न करणे.**

**ब) बालकांना सकस अन्न पुरविणे.**

**क) बालकांचे आरोग्य चांगले ठेवणे.**

**ड) बालकांना शिक्षण देणे.**

**इ) बालकांच्या सांस्कृतिक बाबींकडे लक्ष पुरविणे.**

1) अ, ब, क, इ 2) ब, क, ड, इ

3) अ, ब, क, ड, इ 4) अ, ब, क, ड

**प्र.10.पुढीलपैकी चुकीचे विधाने ओळखाः**

1) यशवंतराव मुक्त विद्यापीठाची स्थापना जुलै 1989 मध्ये झाली.

2) हे देशातील पाचवे मुक्त विद्यापीठ आहे.

3) याचे मराठवाड्यातील क्षेत्रीय कार्यालय औरंगाबाद आणि लातुर येथे आहे.

4) वरीलपैकी एकही नाही.

**प्र.11.अपंग विद्यार्थ्यांसाठी माध्यमिक शिक्षणाच्या योजनेसंबंधी असत्य विधाने ओळखा.**

**अ) ही योजना 2009-10 ला सुरू झाली.**

**ब) ही योजना राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाचा भाग नाही.**

**क) केंद्रीय निधीची तरतूद 100% आहे.**

**ड) योजनेअंतर्गत राज्यसरकार विद्यार्थ्यांना वार्षिक 500 रु. ची शिष्यवृत्तीची तरतूद करील.**

1) फक्त ब 2) ब, क 3) ब, ड 4) ब, क, ड

**प्र.12.सत्य विधाने ओळखा.**

**अ) 10+2+3 असा शैक्षणिक आकृतिबंध राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 ने सुचविला.**

**ब) महाराष्ट्र शासनाने हा आकृतिबंध 1978 ला स्वीकारला.**

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ आणि ब दोन्ही 4) कोणतेही नाही.

**प्र.13. सत्य विधाने ओळखा.**

**अ) केंद्रीय अर्थसंकल्प 2018-19 नुसार शिक्षण क्षेत्रातील एकीकरण आणि आर्थिक जबाबदारी वर भर देण्यात आला आहे.**

**ब) यावर आधारित समग्र शिक्षा योजना राबविली जात आहे.**

**क) या अर्थसंकल्पात शिक्षणासाठी रु. 85,010 कोटी निधी देण्यात आला आहे.**

1) अ, ब 2) ब, क 3) अ, ब, क 4) अ, क

# 12. कायदे - 1

प्र.1. केंद्रीय माहिती आयोगाबद्दल खालील विधाने विचारात घ्या.

अ) मुख्य माहिती आयुक्त हे पद धारण केलेल्या दिनांकापासून पाच वर्षे किंवा वयाची पासष्ट वर्षे यापैकी जे आधी पूर्ण होईल तोपर्यंत पद धारण करतात.

ब) माहिती आयुक्त आपले पद धारण केलेल्या दिनांकापासून पाच वर्षे किंवा वयाची पासष्ट वर्षे यापैकी जे आधी पूर्ण होईल तोपर्यंत पद धारण करतात.

क) मुख्य माहिती आयुक्ताचे वेतन आणि भत्ते सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणे असतात.

ड) माहिती आयुक्ताचे वेतन आणि भत्ते उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणे असतात.

वरीलपैकी चुकीचे/ची विधान/ने निवडाः

1) अ,ब, क, ड  2) अ आणि ब  3) क आणि ड  4) वरीलपैकी एकही नाही.

प्र.2.अचूक विधान/ने निवडा.

अ) आणीबाणीची उद्घोषणा अंमलात असताना लोकसभेचा कार्यकाळ एका वेळी एक वर्षापेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी वाढवता येतो.

ब) राष्ट्रपती राजवट लागू असताना राज्य विधानसभेचा कार्यकाळ एका वेळी सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी वाढवता येतो.

1) अ फक्त  2) ब फक्त

3) अ आणि ब फक्त  4) अ आणि ब दोन्ही नाहीत.

प्र.3. प्रशासनात पारदर्शकता येण्याकरिता माहिती अधिकार अधिनियम, 2005 (RTI Act, 2005) ची महत्त्वाची भूमिका वारंवार अधोरेखित होते, माहितीचा अधिकार योग्यरीत्या वापरता येण्यामध्ये खालीलपैकी कोणत्या अडचणी समोर आलेल्या आहेत ?

अ) या कायद्यासंबंधीच्या प्रशासकीय रचनेमध्ये असणारी रिक्त पदे (vaccancies)

ब) काही लोकांकडून कायद्याचा दुरुपयोग

क) कायद्याचा वापर करणाऱ्यांना भीतीमुक्त वातावरणाचा अभाव

1) फक्त अ आणि ब  2) फक्त ब आणि क  3) फक्त अ आणि क  4) सर्व अ, ब, क

प्र.4. 97 वी घटनादुरुस्ती नंतर महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था (दुरुस्ती) कायदा 2013' हा पास केला. यामधील तरतुदी खाली दिल्या आहेत.

अ) नवीन कायद्यानुसार संचालक म्हणून काम करणारी व्यक्ती 'तज्ज्ञ व कार्यशील' असली पाहिजे.

ब) 'जागृत' सदस्यांनाच यापुढे विचारात घेणे अपेक्षित आहे. अजागृत सदस्यांची 5 वर्षांनी मतदानाच्या हक्कातून तर 10 वर्षांनी संस्थेतूनच हकालपट्टी करावी.

क) नवीन कायद्यानुसार संचालक, व्यवस्थापकीय सदस्य कर्मचाऱ्यांना शिक्षण व प्रशिक्षण सक्तिचे करण्यात आले.

ड) व्यवस्थापकीय समितीचा कार्यकाळ पूर्वी 5 वर्षांचा असे, तो आता 6 वर्षांचा करण्यात आला आहे.